नि. दि. दावा क्र. ४९६/२०१९
हनुमंत वि सुग्रीव
निशाणी क्र. ६४

**साक्षीदार क्र. २ चा उलटतपास प्रतिवादी चे तर्फे वकील श्री. ए. एस. जगताप यांचे मार्फत**

माझे शिक्षण सातवी पर्यंत झाले आहे. मला लिहिता वाचता येते. आम्ही चार सख्खे भाऊ होतो, एक भाऊ मरण पावला. वादी व प्रतिवादी हनुमंत व सुग्रीव हे माझे सख्खे भाऊ आहेत. माझा मयत भावाचे नाव अनिल असे होते. आम्हा चौघा भावांना वडणेर व देवगाव येथे जमीनी होत्या. वडणेर येथील जमीनीचा गट नंबर ९१ आहे. देवगाव येथील जमीनीचा गट नं.४४ व ४२ आहे. या जमीनी काही वडिलार्जित आहेत काही खरेदी केलेल्या आहेत. खरेदीची जमीन देवगाव येथील गट नंबर २८ मध्ये आहे. मला वाटणीपत्रामध्ये गट नंबर २८ मधील जमीन वाटुन दिली. वाटणीचे साल लक्षात नाही. मला ५० गुंठे क्षेत्र वाटुन दिले. पुर्वेला – विकास ज्ञानदेव चौधरी यांचे शेत, पश्चिमेला विठ्ठल शिंदे यांचे शेत, दक्षिणेला– विकास चौधरी यांचे शेत, उत्तरेला – काशिद यांचे शेत आहे. मला वाटुन दिलेले क्षेत्र जिरायत आहे.

प्रश्न – सन २००७ मध्ये तुम्हा तिघां भावांना विहिर पाईप असलेले जमीनीचे वाटप झाले ?

उत्तर– जमीनीचे वाटप झाले. विहिर व पाईप नव्हते.

हे म्हणणे खरे आहे की, सन २००७ मध्ये झालेल्या वाटपामध्ये गट नं ४४ व ४२ मध्ये जमीनी प्रतिवादी यांना दिले होते. गट क्र. ४४ मधील ६८ आर क्षेत्र वादीला वाटुन दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. ४४ हा नदीच्या जवळ आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. ४४ मधुन गट क्र. ४२ मधुन अडीच इंची पाईपलाईन गेलेली आहे व पाईपलाईनचे कॉक गट क्र. ४४ व ४२ मध्ये आहेत. हे म्हणणे खरे नाही की, ०१.१०.२००७ रोजी करण्यात आलेल्या स्मरणपत्रानुसार मला जमीन वाटुन दिलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. ४२ व ४४ मध्ये मला जमीन

दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, ०१.१०.२००७ चे स्मरणपत्र विहिर व पाईपलाईन बद्दलचे होते. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. ४४ मधील विहिरीचे संदर्भात लाईटचे कोटेशन माझ्या वडिलांनी सन १९८९ मध्ये घेतले होते. हे म्हणणे खरे आहे की, सन १९८९ साली आम्ही अज्ञान होतो. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, वडिलांनी कोटेशन घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, ते कोटेशन गट क्र. ४४ मधील विहिरी संदर्भात होते. हे म्हणणे खरे नाही की, ती विहिर व पाईपलाईन हनुमंत व सुग्रीव मिळुन वापरायचे. साक्षीदाराला त्याचे शपथपत्र नि. क्र. ६४ दाखवण्यात आले व त्यावरील सही दाखवण्यात आले. साक्षीदाराने त्यावर त्याची सही असल्याचे नाकारले. साक्षीदार आता सांगतो की, शपथपत्रावर माझी सही आहे.

आता साक्षीदारास दस्तऐवज यादी नि. २९ सोबत दाखल असलेले दस्तऐवज क्र. १ वरील सही दाखवण्यात आली. साक्षीदाराने त्याची सही असल्याचे मान्य केले. हे म्हणणे खरे आहे की, मी त्यावर वाचुन सही केलेली आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. दस्तऐवजास **निशाणी क्र. ७०** देणेत येते. हे म्हणणे खरे नाही की, मी वादी हनुमंत च्या सांगणेवरुन साक्ष देणेस आलो. हे म्हणणे खरे नाही की, वादी यांचे सांगणेवरुन मी शपथपत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल केले व खोटी साक्ष दिली.

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by DILIP GANGADHAR JAGTAP
Date: 2026.07.29 17:02:09 +0530

( दिलीप गं. जगताप )
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, परंडा

दिनांक–२९.०७.२०२६